# जळवंती

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
स. नं.



REFBK-0010561
REFBK-0010561

सुधांशु

# जलवंती

( कविता संग्रह )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................. पि: ..................
क्रमांक ..................नों: दि: ..................

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०४६७

REFBK-0010561
REFBK-0010561

सुधांशु

● प्रथमावृत्ति : १९५८

● सर्व हक्क लेखकाधीन.

● किंमत दोन रुपये

● प्रकाशक :
**पंडित अनंत कुलकर्णी**
**कुलकर्णी ग्रंथागार**
१८६ शनवार, पुणें.

● मकरसंक्रमण
१४ जानेवारी १९५८

● मुद्रक :
**न. शं. कुलकर्णी**
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
७७ शनिवार, पुणें २.

● या संग्रहांतील – – कललें चांदणें – वटवृक्ष – अशी सकाळ – माझिया अंगणांत – नाहीं म्हणूं नको – भरला रांजण – माझ्या मनींचीं पांखरें – नाहीं सांगितलें तुज व अशाच वेळीं निळया जळावर, मला ती आवडते झोपडी हीं काव्यें भारतीय नभोवाणीच्या सौजन्यानें.

प्रिय पत्नीस—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २२८५९ वि. ३/०५
क्रमांक ९३८४ नों. दि. ३१/१२/८८

## सुधांशु–साहित्य

| | | |
|---|---|---|
| १ | कौमुदी | [ काव्य ] |
| २ | विजयिनी | [ काव्य ] |
| ३ | खडकांतील झरे | [ कथा ] |
| ४ | चतुरादेवी | [ बालवाङ्मय ] |
| ५ | सुभाष-कथा | [ बालवाङ्मय ] |
| ६ | ने. स्वातंत्र्य-संग्राम | [ पोवाडा ] |
| ७ | उगवते तारे | [ प्रा. काव्य ] |

आगामी –

| | | |
|---|---|---|
| १ | गीत-सुगंध | [ भावगीत ] |
| २ | सोनेरी गुलाब | [ बालकथा ] |
| ३ | चंद्रकळा | [ काव्य ] |

‘ सुधांशु ’
सुधांशु-सदन, औदुंबर [ द. सातारा ]

# ज ल वं ती

## तुझ्या मंगलचरणीं

कधीं आपुल्या सदनीं
येती थोर मोठे लोक
आणि म्हणतात तुज
'थोर बाई तुझा लेक'

तुझे विनयाचे बोल—
'दत्तगुरूंचें वात्सल्य
मी ही अडाणी अपंग
माझें बिचारीचें काय ?'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०४६९

असें तुझें थोरपण
कसें शब्दांत वर्णावें
कसें सागराचें जळ
पात्रीं इवल्याशा घ्यावें

तुझ्या वात्सल्यांत आहे
चंद्रिकेची सुधाधार
त्याच सुधेनं ग झालें
माझें जीवन मधुर

कथा–पुराणांमधील
कधीं उधळिशीं रत्नें
कांहीं त्यांतील टिपून
केलीं पूजेचीं साधनें

तुझ्या शब्दांशब्दांतून
ओवी अभंगांचे मोतीं
तेच वेंचिले नि केली
सरस्वतीची आरती

जुनी केशरकस्तुरी
कांहीं नवतीचीं फुलें
अशा विविध संस्कारीं
तुझें अंतर खुललें

त्याच सौंदर्याच्या राशी
आणि वैभव लुटून
काव्यदेवतेला माझ्या
चढविलें मीं भूषण

आज चालला असा हा
माझा सानंद सत्कार
तुझें लेणें मिरवतां
माझा भरतो ग ऊर

सारें तुझेंच तुझेंच
तूंच काव्याची जननी
माझी गौरव सुमनें
तुझ्या मंगल चरणीं

●

# मंगलते ये

मंगलते ये मंगल सुचवित
मावळणाऱ्या मनांमनांतुन आशांचे नवदीपक उजळित !

फुलवित ये तिमिरांत चांदणें
घुमवित ये समिरांत गायनें
ये दगडांतुन खलहृदयांतुन सद्भावांचे कळे उमलवित

ये हास्यांतुन उधळित दीप्ती
अन् वचनांतुन माणिकमोतीं
ये स्पर्शांतुन खुलवित सृष्टी आणि मुलायम कटुता बनवित

ये फेंकित संजीवक किरणें
ये जिववित तूं अनंत मरणें
सुंदरतेचीं लेउनि वसनें नंदनवानिंचा सुगंध उधळित

तरूलतांतुन वसंत हंसवित
आणि सुवर्णी कणकण मढवित
शरद् ऋतूंतिल नवसुषमा ये मर्त्य जिवांना तिळतिळ वाटित

ये निर्मित मधुतर स्वरवलयें
श्रववित कवनें ऊर्जस्वल ये
ललकारित ये अभयाचे वच सत्ययुगाची ध्वजा फडकवित

●

# माझिया कृष्णाकांठावर

माझिया कृष्णाकांठावर
सामर्थ्यानें सौन्दर्यानें न्हातें अभ्यंतर !

ऋषीमुनींच्या दिव्य तपांतुन
भक्तिमुक्तिचें घुमलें गायन
जिवाशिवाचें घडलें मीलन नटला परमेश्वर
स्फुरलें जीवन जलामृतानें
नवतेजानें उठलीं रानें
कणांकणांतुन वीर निपजले तरारलें वावर
रसरसलेला इथला वारा
भिरभिरला दावीत दरारा
धडकी भरली रिपूसरदारां थरथरलें अंतर
ताठ राहिली मान सदोदित
अभिमानानें नटलें जीवित
आत्मबलाचे लेख तळपती हृदयांहृदयांवर
धैर्यवंत वज्राची छाती
भीमपराक्रम दणकट हातीं
झुळझुळती अंतरांत हंसरे प्रेमाचे पाझर
खुलीं वावरें खुलीं अंतरें
बंध इथें नच मानवणारे
भाव खुले रेखिले मुलायम क्षितिजावर सुंदर
संतांचीं पाउलें उमटलीं
शूरांची संपदा विखुरली
नवजीवांच्या नव आशांनीं लखलखलें अंबर
धडपडणारा मीही बालक
जीवन संग्रामांतिल सैनिक
घरकुलास माझिया वाहत्या आईची पांखर

## लाजून मी गेलें

सायंकाळ आज बाई हळूं हळूं चाले
आज सकाळींच यांनीं
गूज कथियलें कानीं

संकेत-कोकीळ माझ्या मनीं कुहू बोले
अवघडली दुपार
चाल मंद हिची फार

अपशब्द हिला नाहीं नाहीं ते बोललें
आज मंदावले क्षण
जणुं गोठलें जीवन

दिवसाच्या पक्षीणीचा पंखही न हाले
आणि मेली सायंकाळ
माझा आरंभिला छळ

पुरे ना ग आतां मला सोसेनासें झालें
आली बाई रातराणी
गात अंतरींचीं गाणीं
आले वाटते हे किती लाजून मी गेलें

●

## का ग ओलावले डोळे

सासर ना ? छे–माहेर !
आई तुझीच पुण्याई
स्वर्गसुख तिथें उणें
सांगायला शब्द नाहीं

कांहीं तरी नको बाई
असं विचारूस आई
किती यांचे गुण सांगूं ?
कशी वर्णूं चतुराई ?

इश्श ! कांहींतरी तुझं
स्वारी भारीच प्रेमळ
यांच्या प्रीतीच्या गंगेत
माझं मिसळलं जळ

सासू ?—आतां खरं सांगूं ?
तुझेंच ग दुजें रूप !
रागाऊं नको हं !...तुज
विसरतें आपोआप

किती जपतात मज
तळहातींचा कीं फोड
साऱ्यांना मी हवी हवी
गोड पायरीची फोड

अनुक्रम २२८८७ वि. ३१८५
क्रमांक ९३८७ नों. दि. ३.११.७१

किती कौतुक करावं
माझं लहान-थोरांनीं
संकोचतो जीव माझा
यांच्या अशा वागण्यांनीं

आई तुझ्या लेकीचीं या
नको मुळीं चिंता करूं
आहे सुखांत नांदत
तुझं लाडीक लेकरूं

कां ग ओलावले डोळे
हळवी तूं भारी बाई
काय बघा माया तरी
आनंदांत रडूं येई !

## जुन्या आठवणी अशा

होतें भंवतीं भंवतीं
जग झोंपलें निवांत
तळमळे तडफडे
माझें अंतर अशांत

गर्द काळोखाची रात
बाहेर न उघडीप
वायु-झोतानें विझला
हेलकावे खात दीप

पाकोळयांची फड फड
पिंपळाच्या फांदीवर
तीच मधून मधून
करी कातर अंतर

गोड हांसू उमटलें
तोंच एकाएकी गालीं
बांसरीचे सुरूं झाले
सूर माझ्या भंवतालीं

अमृताच्या सिंचनानें
विझली आंतली आग
माळावर मोहरली
मोहकशी फुलबाग

धुंदावलें क्षणार्धांत
सुगंधानें तनमन
मला माहीत परंतु
जादुगारिणी या कोण

जुन्या आठवणी अशा
केव्हां केव्हां फुलतात
आणि मज रिझविती
घालुनिया पाळण्यांत !

●

## तिथें पलीकडे

'तिथें पलीकडे माझ्या सासरचें गांव
तिथें जरापुढें माझ्या ओळखीची शींव

तिथें पलीकडे लहानसें घरकूल
तोच हिऱ्यामाणकांचा अमुचा महाल

तिथें पलीकडे निर्मळशा अंगणांत
गोड पारिजात करी शुभ बरसात

तिथें पलीकडे माझें हंसरें शिवार
तिथें माझिया पिकांस आगळा बहार

तिथें पलीकडे वारा वाहे झुळझुळ
गुपित अमुचें मेला ऐकतो खट्याळ

तिथें पलीकडे चंद्र चांदण्या चावट
गूज रंगतांना खुदुखुदु हंसतात

तिथें पलीकडे माझ्या आवडीचा देव
माहेरीं मी जरी तिथें माझा जीवभाव

सोनियाची खाण तिथें चंदेरी वैभव
धरित्रींत गाजे माझ्या साजणाचें नांव–

●

# चंद्रकळा

कृष्णामाउलीचा आज उत्सव
घाटावरी नारीसंभार फुले
विविध रंगांच्या नव वसनीं
काळी चंद्रकळा विशेष खुले

वदन विलोल शोभायमान
चंद्रकोर जशी नभांत हांसे
नीटस रेखीव शरीरकांती
डौलदार चाल मनांत ठसे

सुवर्ण सांखळी सुंदर कंठीं
कानांत कुड्यांचे रत्नदीपक
अस्फुट अधीर ओठींचें स्मित
नयनांत भाव किती मोहक!

चपलचरणीं वावरते ही
जणुं लवलवे नाजुक वेली
नव–यौवनाची पहांट फुले
हिचिया लोभस गुलाबी गालीं

आणि संपतांच कृष्णापूजन
घरीं परतल्या सर्व कामिनी
कमनीय शांत चंद्रकळा ही
हळू रेंगाळते माझिया मनीं

## कललें चांदणें

थोडें कललें चांदणें
थंड झुळझुळे वारा
झोंप चाळवली जरा !
शेजीबाईचा कोंबडा
देई आरवून जाग
आज परी उरीं आग
जरा कुशींत शिरावें
पण आज तिथें कोण ?
जळे विरहानें मन
यांची दुलई प्रीतीची
घेतली मी अंगावर
जळे तिचेंही अंतर
उशीमधूनही येती
आज विरही उसासे
होई तिलाही कसेंसें
भारी विसराळू स्वारी
घरीं विरही माणूस
दाद तयाची कुणास !
गेले कुठल्याशा गांवीं
कधीं यायचें कळेना
झुरे एकलीच मैना
कुठें बाई असतील
असतील ना सुखांत
क्षेम चिंतितें मनांत !

●

# अमृत–शिंपण

श्रावणांत कशी येते तुझी आठवण!
होता मंद मंद वारा
गार पावसाच्या धारा
कुठें नव्हता निवारा

एका तरूतळीं आलों क्षण दोघेजण
नाहीं बोललोंच कांहीं
अंग चोरून दोघेही
तुझ्या नवतीची राई–

जरा ओलसर शोभे तुषारांनीं पण
होतां जरा अंगलग
मोहरलें अंग अंग
गालीं तुझ्या खुले रंग

झाली तुझ्या माझ्या मनीं गोडशी गुंफण
आणि पाऊस सरतां
बोललीस ' जाऊं आतां '
दृष्टिक्षेप ओझरता

नयनांनीं केली तुझ्या नाजुकशी खूण
आतां तूं तुझ्या सासरीं
आणि मी माझिया घरीं
खरं सांग कधीं तरी
स्मरते ना तुजला ती अमृत-शिंपण ?

●

# नको त्या वाटेला

आतां नको त्या वाटेला
नको त्या वाटेला !

तिकडे त्या गर्द वनराजींत
तिकडे त्या शांत कृष्णाकिनारीं
तिथें उमललीं गुलाबपुष्पें
तिथेंच जाहला दाह अंतरीं

कटु स्मृति त्या कशाला
स्मृति त्या कशाला

सायंकाळ होतां तिथें रंगली
उधळित नवें स्वर्णवैभव
जलवंतीवर चंद्र तरंगे
तरंगे अंतरीं मधुर भाव

आज रंग तो विटला
रंग तो विटला

झाल्या गोष्टी झाल्या आज मी शांत
पचविलें सारें उरीचें आर्त
आज वळणच नवें जीवनीं
आज नवीनच ओठांत गीत

नको गिरकी लयीला
गिरकी लयीला

आतां नको त्या वाटेला
नको त्या वाटेला !

# कृष्णेच्या घाटावर !

कृष्णेच्या घाटावर !

रजनि सरे तिमिर सरे
शीत पवन हळुं विहरे
उघडि नयन दिग्ललना जागृत होई परिसर

लेउनी कषायवसन
यति ये कुणि मंदचरण
स्पर्शें त्या हो पावन कणकण जणुं लाधे वर

ये हांसत उषा विमल
सृष्टीचें तपन सफल
मंदिरिं हो जागृत प्रभु घुमति मंत्र रामगजर

कंजाळीं गुणगुणती
कुशल भाट विहगतती
स्नानदान कोलाहलिं निमुट जाय दूर सुसर

ललनांचे कंकणरव
मिरविति सौभाग्यविभव
पुलकित हृद्भाव, बोल घुमती हर कृष्णे हर

ये संध्या शुभचरणीं
हो पुलकित नव तरुणी
आल्हादक समय सुखद, डुलति वृक्ष औदुंबर

अर्घ्य देति द्विज वरुणा
साक्षिभूत हरि करुणा
दीप सोडिती ललना चंद्र डुले लाटांवर

मंदिरांत घंटारव
अंतरांत भक्तिभाव
पात्रांतरिं डुलत नाव सर्व शांत अन् सुंदर

रजनीची ये चाहुल
टाकितसे तम पाउल
नीरवता मंदपदीं पसरित मायापांखर

हळुंहळुं निद्रिस्त सकल
साधक परि कुणी कुशल
प्रवाहांत बनुनि विमल आळवितो परमेश्वर

कांठावर घाटावर
मंगल चारीहि प्रहर
शुभ सारें, शुभ वारे, अणुअणु इथला शुभकर

कृष्णेच्या घाटावर !

●

# विनोबाजी

किती दिसांनीं किती दिसांनीं
ज्ञानराज हे अवतरले
अवतरले अन् कोवळिकेचें
शीतल चंदन दरवळलें

कृशयष्टी, पण आत्मबलाचा
निर्झर हृदयीं झुळझुळतो
झुळझुळतो अन् नवक्रांतीचा
मंत्र मुखांतुन पाझरतो

यज्ञच जीवन यज्ञच भूषण
ज्योत तयाची धगधगते
त्या ज्योतीनें त्या दीप्तीनें
मनामनांतील तम विरतें

दिक्कालाला भेदी दृष्टी
सृष्टी मुजरा त्यांस करी
करुणा त्यांची विश्वावरती
मांगल्याचें छत्र धरी

किती दिसांनीं किती दिसांनीं
ज्ञानराज हे अवतरले
अवतरले अन् कोवळिकेचें
शीतल चंदन दरवळलें

●

# सखि तुझ्या सहवासीं

सखि तुझ्या सहवासीं
दरवळे पारिजात
  सांवळ्याशा कांतींतून
  कोकिळाच जणुं गात

कवि लहरी मी जरी
सांभाळिसी माझें मन
  माझ्या नादिष्टपणाचा
  कोण तुज अभिमान!

सुजनांच्या सत्काराचा
नाहीं कधींच आळस
  सदा स्नेहल स्वागत
  तुझा स्वभाव लोभस

कधीं रसिका बनून
घेसी काव्यांतला रस
  तुझ्या कंठांतून देसी
  तयां आकार सुरस

संसारांतला गोडवा
माझ्या वांट्यास ठेवून
  कटु कंटक साहतां
  तुझें सुहास्य वदन

दा. क्र. १०५६७

आंत चहाचें आधण
सांभाळतां बाहेरील
काव्यशास्त्र-विनोदाचे
कण टिपशी अमोल

नाहीं भूषणांचा सोस
नाहीं वस्त्रांचा विलास
माझ्या कीर्तीचा दर्वळ
तुझ्या सुखवी जिवास

तुझा सद्गुण सुगंध
माझें मन करी धुंद
चंद्रमौळी झोपडींत
खुले स्वर्गीय आनंद

●

# कृष्णाबाई बहरली

कृष्णाबाई बहरली
नव यौवनाची हिनें लाल शाल लपेटली
उसळत उन्मादांत
अंग अंग घुसळीत

सागराच्या दर्शनाची आतुरता आकारली
गात प्रणयाचें गान
कराया जीवनदान

मायामोह विसरून धांव पुढतीं घेतली
धुंद ताल धुंद चाल
झेंप बेबंद विशाल

आवेशांत भंवतींच्या स्थिरचरां विसरली
झेंपावतां पुढें पुढें
तीर जाहले तोकडे

डगरींचे तट चढे ईर्षा उरीं आसुसली
कोण हिला आवरील
वेग कधीं ओसरेल

तृप्त होईल संपतां वर्षाऋतूंची सांवली
कृष्णाबाई बहरली

●

## कधीं दिनांतीं

कधीं दिनांतीं कातरवेळीं
सरतां ही दिवसाची वर्दळ
हळव्या माझ्या अंतःकरणीं
दुःस्वप्नांची उठे भुतावळ
कधीं दिनांतीं कातरवेळीं
सरूं लागतां संध्याछाया
पुसट जाहल्या आठवणी त्या
चाळवती—थरथरते काया
कधीं दिनांतीं कातरवेळीं
सारुनि पडदा आभासाचा
हळुच पाहतों बुजऱ्या नयनीं
सलता कांटा गतगोष्टींचा
कधीं दिनांतीं कातरवेळीं
उडुनी जाते बाह्य सजावट
उरतें विरल्या कटु भावांचें
केविलवाणें पडकें खोपट
कधीं दिनांतीं कातरवेळीं
उपभोगांची मिजास सरते
आणि मनाच्या मैदानावर
आकांक्षांची चिता भडकते
कधीं दिनांतीं कातरवेळीं
कृष्णेच्या तीरावर बसुनी
दडपुनि गेल्या व्यथित मनाची
तिला सांगतों करुण कहाणी

●

# कृष्णाकांठावरील चांदणें

कृष्णाकांठावरीं चांदणें, गुणगुणतें चंदेरी गाणें
तीरावरल्या मळया सुंदर
पऱ्या नाचती नभिंच्या त्यांवर
ताल धरी झुळझुळता वारा हंसतीं अभिनव जीवनस्वप्नें
चमचम करिती नवथर लहरी
उरीं उभविती नवीन नगरी
हृदयिं जगाच्या फुलतीं कुसुमें मुखीं मुलायम मंजुळ कवनें
रजतरसानें नटवुनि काया
सजलीं सुंदर रानें, राया
परिसर सारा कुसुमित कंपित लेउनि शिरिं सौन्दर्यभूषणें
औदुंबर कंजाळ तरूवर
लेउनि बसले वसनें सुंदर
भोगिति ब्रह्मानंद, सोडविति निवांत प्रभुचे गूढ उखाणे
घाट मंदिरें करितीं झळझळ
मांगल्याचा सुटला परिमळ
सुवर्णगौरव होय पराजित, खुलें जिवाला मंगल उटणें
खालुनि वाहे मधुतर अमृत
वरुनी वर्षित विधुही अमृत
अतुल अमर सौभाग्य निर्मिलें निजहस्तानें परमेशानें
इथें जरी मी निर्बल निर्धन
विसरुनि जातों अपुरें जीवन
न्हातों नवथर धुंदीमाजीं, गुंजत वदनीं तुंग तराणे

●

## नाहीं सरायचं पाप

पश्चिमेच्या गालीं कुणी चुंबिलें ग हळू
एक एक तारा लागे नभांगणीं खेळूं
मंद पाउलें टाकीत पातला तिमिर
हळू हळू धूसरलें नाचरें शिवार

परतली पांखरांची भिरी घरट्यांत
चहूंकडे शांत, कुणी नाहीं शिवारांत
भेटीचीही वेळ गेली कधींची टळून
कसं यांना समजावं दुसऱ्याचं मन

कसं परतावं यांनीं अवचित यावं
कशास कुणाला असं कोड्यांत टाकावं
पुरुषांचं बरं बाई सारे गुन्हे माफ
पोरींच्या जातीचं नाहीं सरायचं पाप

सळसळ पाचोळ्यांत कसली कुणाची
नका फसवूं हं चाल माझ्या ओळखीची
आतां सुटलें लावूं दे कुणी किती बोल
आला सजण सखीचा सांवराया तोल

●

# तुझ्यासारखीच

तुझ्यासारखीच तुझी कन्यका
लतिकेपरीच कलिका गोड
तशीच नाजुक रेखीव कोर
ओठीं तशीच ग हापूस फोड

गालीं खळी जशी पुष्पपाकळी
जणुं अमृताची मधु अंजुळी
नयनीं नाजुक चांदण्या दोन
सरळ नासिका चांफ्याची कळी

तुझ्यासारखाच तत्पर राग
तुझ्यासारखेंच मोहक हांसूं
तुझ्यासारखेंच हळवें मन
अकारण आणि नयनीं आसूं

डौलदार चाल तशीच बाई
स्वभाव अगदीं तसाच मानी
तुझ्यासारखीच तुझी प्रतिमा
आर्जव अगत्य तसें नयनीं

तशीच होईल पोर लबाड
गंध वितरील हिचें यौवन
आणि कुणीतरी युवक वेडा
होईल हिचिया चरणीं लीन

●

## खुलेल केव्हां

फुरंगटलेल्या
विहीणीपरी
फुगून बसलें
वर आकाश
दुर्मुखलेले
व्हावे वऱ्हाडी
वसुधा सारी
तशी हताश
खुलेल केव्हां
वरची सासू
फुटेल केव्हां
खालतीं हांसूं

●

# वटवृक्ष

माझ्या घराच्या समोर
एक वटवृक्ष थोर
किती शतकें उभा तो
प्राचीन कीं ऋषीवर

पारंब्या विशाल याच्या
जटा जणुं तपस्व्याच्या
तिन्ही त्रिकाळ राहिला
कृती पाहात जगाच्या

काळे हिरवे रंगीत
सानथोर खग गण
रोज खांद्यावर याच्या
भरविती संमेलन

छायाप्रकाशाचा खेळ
रोज चाले अंगावर
नित्य नव्या आल्हादानें
याचें ओसंडे अंतर

नवनव्या ऋतूंतून
नवनवीं रूपें घेई
सर्वांना आधार याचा
सर्वांनाच अपूर्वाई

आणि माझें तर यानें
सारें व्यापिलें जीवन
दैनंदिनीस माझिया
याच्या कृपेचें कोंदण

शुभकार्यीं गुंततां मी
निज मंद लयींतून
आशीर्वाद मज देई
तेंच मज संजीवन

डोकावतां दुष्ट भाव
रोष दावी याची चर्या
आणि सळसळींतून
उसळतो क्षुब्ध दर्या

आणि घसरतां पाय
क्षमाशील याचें मन
ध्येयमार्गावर करी
छाया शीतळ प्रसन्न

वटराज मज भासे
वडीलधारींच कुणी
धीर देई मार्ग देई
क्षेम चिंतीतसे मनीं

दिवसाच्या साठ घटी
माझ्या जीवनीं भरून
हेलावतें ओसंडतें
याचें विशाल जीवन

●

# याच कांठावर

याच कांठावर याच घाटावर
सांगु नको पण मज कळली
प्रीतकळी तुझ्या मनीं फुलली

कृष्णेंत भरतां घट कटींचा
रिताच राहिला कसा ग मुली
मुरली हरीची कुठें वाजली

सायंकाळचीं सोनेरीं उन्हें
जललहरींच्या संगें नाचतीं
तुझ्या अंतरांत रंग खेळतीं

शुभ्र पातळांत यौवन हंसे
नयनांत किती मधुर भाव
कुणासाठीं सांग असें लाघव

बावरून अशी कां ग पाहसी
येते कां कुठून खुणेची शीळ
छे ग, पंचमांत बोले कोकीळ

रानवेल आतां कशी मोहरे
अंगप्रत्यंगांत सुगी दाटली
सांग ना ओळख कशी पटली

●

# नदीच्या किनारीं

नदीच्या किनारीं
  पश्चिमेच्या गालीं
  मोहरली लाली
कुणी कुजबुजे माझिया अंतरीं
  नाचतां लहरी
  गोड शिरशिरी
कुणी कुठें तरी वाजवी बांसरी
  गोरज वेळेस
  माझिया मनास
झोंबती लाजऱ्या गोड हुरहुरी
  मळींत डोलती
  गवताचीं पातीं
रूप न्यहाळती डोहांत बिलोरी
  एखादी चांदणी
  बघे डोकावुनी
मनांत माझिया अशीच किशोरी
  अशीच किशोरी
  माझिया अंतरीं
खुणाविते कशी हळूच लाजरी
  नदीच्या किनारीं

●

# किती मी बोललें

कां हो बोलवितां मज
कसें बाई बोलायचें
माझें व्रतच मुक्याचें

कसें गावूं सांगा तरी
माझ्या मनींचें गुपित
कसें येईल ओठांत

नका चालूं बिलगून
मज कसें हें जमेल
मी ना लाजाळूची वेल

एरवीं मी धीट पोर
आजबाई बावरलें
नाहीं असें कधीं झालें

रुसला ना बाई बाई
राग कसा नाकावर
पसरूं कां मी पदर

हंसला ना भारीच हं
अशी कशी मी फसलें
इश्श किती मी बोललें !

●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 22८४९ वि. ...
क्रमांक 93८४ नों. दि. 3919194

# इश्श खरं !

नवरात्रींच्या रात्रीं तूं कां ग जागलीस
भजनपूजनीं किती श्रांत ग झालीस

कोमलशा कायेवर आलें म्लानपण
शिणलेला भागलेला तुझा कण कण

कधींपासून झालीस इतुकी भाविक
चंचललोचना झाली कशी अंतर्मुख

छे, छे, दिसतें हें जरा वेगळेंच कांहीं
इश्श ! खरं ?... बरीच कीं आहेस तूं बाई !

## हवी होतीस

पहांटेच्या वेळीं
झोंबतो गारवा
गोड अंगास
अशा वेळीं तूं
हवी होतीस—

दिशादिशांत
दाटे उल्हास
दरवळला
रातराणीचा
धुंद सुवास
मत्त मोगरा
मादक उष्ण
सोडितो श्वास
अशा वेळीं तूं
हवी होतीस—

जेव्हां धुंदींत
होतों नाहलों
आणि मनांत
येऊन खुशींत
वसंत हंसे
शुक्राचें तेज
फुलवी मनीं
मधुर भास
अशा वेळीं तूं
हवी होतीस—

अशा वेळीं तूं
हवी होतीस
जेव्हां निद्रेंत
जग रंगलें
निःशब्द शांतीचे
प्राशून प्याले
मदिर भावना
वेढिती जेव्हां
माझ्या मनास
अशा वेळीं तूं
हवी होतीस —

●

## अशी सकाळ

कधीं उगवते
अशी सकाळ
अमृत पाजिती
सोनेरीं उन्हें
पवन भरितो
नव उत्साह
कणकण नाचे
नव्या जोमानें

वाटतें रवीचा
गिळावा गोल
नभींच्या रंगांनीं
रंगून जावें
प्राशून सातही
सागर प्याले
तीन पाउलांत
जग जिंकावें

ग्रहांच्या ओंजळी
आणाव्या खालीं
मुलांना खेळाया
होतील खडे
जरा अंगुलीनें
फोडून नभ
करावें स्वर्गीचें
दार उघडें

तिमिराचा तर
लेशही नुरे
वाहतो तेजाचा
शांत ओहळ
उधळित नवें
दिव्य सामर्थ्य
कधीं उगवते
अशी सकाळ

•

## कुणीच नाहीं आज बरोबर

घाटावरतीं नको जायला
नको बसाया नौकेमाजीं
नकोच शोभा नदीकांठची
नको दिसाया ती वनराजी

नको चांदणें धुंद मनोहर
नको सुगंधी वायू सुंदर
खेळ नको लाटांचा बघणें
कुणीच नाहीं आज बरोबर

●

# खोली

माझ्या घराची
छोटीशी खोली
गंध वितरी
पुष्प अबोली

दोन खिडक्या
एकच दार
निळी बैठक
चौपाईवर

समोर चित्र
महात्माजींचें
उरीं फुलवी
कुंज शांतीचे

किर्लोस्करांचें
दिनदर्शक
डाव्या हाताशीं
दावी दिनांक

माझ्या खुर्चीशीं
टेबल छोटें
ग्रंथ संगतीं
सुजाण मोठे

माझ्या मनींचे
लाख संस्कार
काव्यीं रचिती
निज मंदीर

छोटी वेदना
कळ उरींची
इथेंच घेते
खोली सिंधूची

इथें प्रीतीचा
नाजुक रव
दिव्य प्रीतीचें
रची वैभव

कुठें खुपतां
इवला कण
इथेंच होई
अंतरीं व्रण

आणि मायेची
पुष्पपाकळी
इथें भरिते
माझी अंजुळी

इथें एकच
तुलसीपर्ण
विश्वाचा राजा
तुळी श्रीकृष्ण

इवली माझ्या
घराची खोली
इथें फुटते
देवाची बोली

●

# आज माउलीच्या डोळां आलें पाणी

आज माउलीच्या डोळां आलें पाणी

काय मी चुकलों
काय विसरलों
जाहलें जीवाचें माझ्या पाणी पाणी
दुखलें कां कांहीं
खुपलें कां कांहीं
कशी ओलावली प्रेमळ पापणी
पत्नी मुलें बाळें
कुणी दुखविलें
छे, छे, त्यांचे बोल तिला सुधेवाणी
देणेकरी कुणी
आले कां अंगणीं
कशी टोलवूं हीं रोजचीं गाऱ्हाणीं
सुखी मीं असावें
नित्य तिनें ध्यावें
माझ्या पराभवीं तिला क्लेशगोणी
तिच्या मायेवर
चढतो डोंगर
क्षुद्र मी-होतांच मायेची आटणी
नाहीं मन शांत
जाहला आकांत
लागली जिवाला भलती टोंचणी
आज माउलीच्या डोळां आलें पाणी

●

# माझिया अंगणानं

माझिया अंगणानं माझिया जीवनींच्या
वेंचिल्या स्मृति कळ्या मधुर मोगरीच्या

भारी मी अवखळ धांवतां खेळण्यास
आईनं पकडून भरवियले घांस

अंगती-पंगतीचा सदाच उडे थाट
आईच्या त्यांत गोष्टी थबके चांदरात

इथेंच काढिली मी ककाची बाराखडी
चंद्राशीं बोलायची लागली इथें गोडी

शिकून कांहीं येतां दूरच्या गांवांहून
इथेंच माउलीनं टाकावं ओवाळून

नकळे कधीं कशी उमले नवी ओढ
नवल इथें लागे डोळ्यांना नवी मोड

उगवे मार्गशीर्ष वरात वाजे गाजे
पायरी चढतांना नवरी नवी लाजे

आजही हंसे डुले मोगरी मोहरून
आजीच्या सांवलींत खेळतीं पिलें दोन

माझिया अंगणानं माझिया जीवनींच्या
वेंचिल्या स्मृति कळ्या मधुर मोगरीच्या

●

## असा मार्गशीर्ष

गुलाबी पश्चिमा
मधुर हांसे
नाजुक प्रश्न कां
कुणाला पुसे

निरभ्र आकाश
मोतिया कोर
फिकट रेखीव
शांत सुंदर

शुक्राची चांदणी
सुस्नात गोरी
हळु मुरकते
गोड किशोरी

अशी संध्याकाळ
टाकी मोहिनी
राहे हुरहूर
दाटून मनीं

असा मार्गशीर्ष
कशाला आला
कशाला आला
छळाया मला ?

●

# नाहीं म्हणूं नको

नाहीं म्हणूं नको
दे शीर उखळीं
असे समर्थाची
सेवाच आगळी

नाहीं म्हणूं नको
वहा नेत्रदळ
प्रभूचें पूजन
असेंच उज्ज्वल

नाहीं म्हणूं नको
दे ओठींचा घांस
अशा देणगीचा
हरीला हव्यास

नाहीं म्हणूं नको
दे देहाचें दान
जरी जगदीश
व्हायचा प्रसन्न

नाहीं म्हणूं नको
हवें ना अपार
सर्वस्वाचे दानां
हो आधीं तयार

●

# गंध लुटावे

कांठावरतीं कधीं बसावें
जललहरींचें गाणें ऐकत
क्षितिजावरतीं सुरू असावी
संध्येची नवरंगी रंगत

त्या रंगांनीं रंगुन जावीं
अंतरांतलीं सुंदर स्वप्नें
इंद्रधनूंपरि सहज फुलावीं
मनांत माझ्या मंजुळ कवनें

तोंच कुणीसें मृदुलकरांनीं
झांकावे मम नयन येउनी
ओळखुनीही अनोळख्यापरि
'कोण' पुसावें अधिऱ्या वचनीं

झुळझुळणाऱ्या हास्यांमधुनी
प्रीतीचे मधुरंग खुलावे
दोघांचें जग नवेंच निर्मुन
नंदनवनिंचे गंध लुटावे...

●

# चेटुक

कुणी पाहुणी अवचित आली
अवचित आली अवचित गेली
सहजच हलके नाजुक हंसली
नजरभेट ओझरती झाली

दिवस बहरला बघतां बघतां
मित्रासंगें हांसत खेळत
संध्याकाळीं हळुं कसलीशी
लहर मनाला गेली चाटत

चाटुन गेली लहर हळूं पण
वीष पसरलें क्षणांत दाहक
पाहुणिनें कां सकाळच्या त्या
हळूंच केलें कसलें चेटुक—

## धांव

गुलाबी पातळ
हिरवी किनार
कृष्णेचा आजचा
निराळाच नूर

निराळाच नूर
यौवनाचा पूर
आणि अंतरांत
वादळ काहूर

राहून उभी तूं
रोज कांठावर
काय न्यहाळिसी
लावुनी नजर

तुझिया उरींची
अशीच कां धांव
असेच ना धुंद
उसळते भाव

●

# जीवन मजला मुळीं न कळलें

जीवन मजला
मुळीं न कळलें
भोंवऱ्यांत मी
सांपडलों
बुडलों आणिक
खोल तळाशीं
कर्दमांत मी
आदळलों

नवलच सारें
तिथें न कर्दम
तिथेंच होतीं
कल्प फुलें
सुगंध तेथें
तरळत होते
तिथें कांचनी
हंस डुले

त्या हंसानें
मला दाविलें
स्वप्न नवें
सद्भाग्याचें
त्या स्वप्नानें
माझें जीवन
झालें मंगल
मोलाचें

●

# भरला रांजण

उजळित होतों मळकें जीवन
भरीत होतों गळका रांजण
फुलवित होतों फुलें कागदीं
घडवित होतों माझें मीपण

उगाच धडपड उगाच सारें
जुळतच नव्हतें स्वप्न मनींचें
केव्हां आशा कधीं निराशा
आणि लपविणें दुःख व्रणाचें

तोंच अचानक आलिस बाई
उधळित सुषमा नवलपरीची
निर्मळ झालें क्षणांत जीवन
फुलली सुंदर कळी मनाची

आलिस बाई कुठुनि कशी तूं
शतजन्मांची ओळख सांगुन
स्वप्नांचें तारांगण खुललें
भरला रांजण-भरला रांजण

# किती झालास रे मोठा

किती झालास रे मोठा
आणि केलीस कमाई
होतास कीं एवढासा
वाटे नवलच बाई

बाळ-पंडित सुदामा
कुणी कांहीं बोलवावें
आणि बोलक्या राघूला
कौतुकानें उचलावें

मुंजा मुलगा पाहिला
घरीं दारीं वावरतां
आज पाहतें मी तुला
ज्ञान लोकांना सांगतां

गात होतास बावळा
पदें पालखीच्यापुढें
होतें कौतुकें ऐकत
लाड मायेचे केवढे

आज लिहितोस म्हणे
कुठें कुठें कांहीं कांहीं
जरी मला न कळतें
मन मोहरून जाई

कवि झालास तूं थोर
मुली-बाळी सांगतात
दावितात छायाचित्रें
मोठेपण मज त्यांत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५६१
संदर्भ शाखा ठाणे

कुणी मुंबईस गाते
तुझें मधुरसें गीत
ऐकतां या यंत्रांतून
सुख दाटतें मनांत

नाहीं वडिलांचें सुख
परी त्यांचीच पुण्याई
वंशवेल तुझ्या रूपें
त्यांची मोहरून जाई

होती धारेला लागली
तुझ्या कुळींचीं रे नाव
भावाबंधांत तुझिया
आज काढिलेंस नांव

हिरा शोभतो ग माझा
थोरपणाच्या कोंदणीं
ऊर भरलासे वाटे
आणि डोळां येतें पाणी !

# नको करूं खंत

काळ्या रंगाची
नको करूं खंत

अंतरांत तुझ्या
मधुर भावांचीं
इंद्रधनुष्यें
सद्‌गुण सुगंध
करितले धुंद
माझें मानस
भावुक नयनीं
मोद वितरित
हांसे वसंत
नको करूं खंत

काळ्या मेघोदरीं
सृष्टीचें ईप्सित
नवें जीवन
रजनी फुलवी
मानवी मनांत
मधुर स्वप्न
हिच्या उदरींच
उषा उमलते
हळूंच गात
गूढ संगीत
नको करूं खंत

माझिया मनास
तूंच लाविलेंस
वेड आगळें
डोलविसी आणि
आशांचे मळे
तुझ्यामुळेंच
लावून पंख
लागे विहराया
मन पांखरूं
निळ्या नभांत
नको करूं खंत

काळ्या रंगाची
नको करूं खंत

●

अनुक्रम 22८८9 वि: काव्य
क्रमांक ...9३८८४.. नों: दि: ३१।१।

## चैतन्य तेवतें

कृष्णा वेरळेच्या
संगमावरतीं
गुरु शिष्य दोघे
समाधी भोगिती

औदुंबरतळीं
संत हे निवांत
ब्रह्मानंदीं लीन
विरागी विरक्त

वरी चिंचबन
खालीं मळीरान
मंद वायू करी
शीतल विंझण

कृष्णेच्या डोहांत
तरंग उठती
गुरुकृपेनें कीं
सानंद नाचती

आनंदांत इथें
समाधी डोलते
निर्जीव वास्तूंत
चैतन्य तेवतें

चैतन्य तेवतें
समाधी डोलतें
चराचर सृष्टि
सुखांत पोहते

●

## माझ्या मनींचीं पांखरें

माझ्या मनींचीं पांखरें
लाडावलीं वेडावलीं
जरा कानांत फुंकतां
दाही दिशांना पळालीं

इथें तिथें चहुंकडे
यांनीं गोंधळ मांडिला
परतून बोलावतां
यावें कुठलें मनाला

पंख फुटल्या पिलांना
घर बनतें तुरुंग
त्यांना हवेत प्राशाया
क्षितिजाचे सात रंग

माझी दुबळीच काया
कसें यांना मी आवरूं
रोज मोतियांचा चारा
कुठवर मुखीं भरूं ?–

# खुदुखुदु हंसे जळ

खुदुखुदु हंसे जळ
आली वाऱ्याला भोंवळ
ऐलतीरीं पैलतीरीं
चोरपावलांचा खेळ

नभांतून डोकावते
एखादी चांदणी हळूं
कुणा खुणावते तरी
पोर हांसरी लाजाळू

मंदीरीं आरती चाले
टाळ-मृदंगांचा नाद
प्रसन्न तो परिसर
झाला नादांतच धुंद

घाटावर कुजबूज
गुलाबी रंगांत न्हाली
रातराणीच्या गंधांत
सृष्टि सारी दर्वळली

सृष्टि सारी दर्वळली
खुदुखुदु हंसे जळ
ऐलतीरीं पैलतीरीं
चोरपावलांचा खेळ

●

# संतुबाइचें मंदिर पडकें

तीरावरतीं चिंचेचें बन
त्याच गुहेच्या कुशींत लपुनी
संतुबाईचें मंदिर पडकें
निवांत बसलें ध्यान लावुनी

तान्ह्या बाळाची ही आई
रक्षण करिते चिलापिलांचें
हिच्या दर्शना आल्यावांचुन
परिसरांत या कुणि न राह्यचें

लेकुरवाळ्या हिच्या दर्शना
नव्या बालका घेउनि येती
वाहुनि हळदीकुंकू नारळ
बाळाला आयुष्य मागती

आवडता नैवेद्य अर्पिती
कालवलेल्या दहिंभाताचा
प्रपंच गोष्टी करित सेविती
प्रसाद सारीं मग देवीचा

स्वैर हुदडती चिंचबनांतून
पूर्वस्मृतींच्या कुशींत शिरुनी
दिवस हळू वर सरतां गगनीं
घेती सारा पट आवरुनी

गुरविणीस खण नारळ देउन
घेती आशीर्वाद तियेचा
अंगारा लावून आइचा
धरिती अपुल्या मार्ग घराचा

हळूं हळूं अन् वाट चालतां
चिंचेचें बन मागें पडतें
संतुबाइचें मंदिर पडकें
चिंचबनाच्या गुहेंत लपतें

●

## तेनसिंग

हे त्रिपुरारी
तुझिया पवित्र
धवल शिखरीं
आज पोंचलों

किती ते श्रम
रक्त आटलें
तरी ही उद्दाम अखंड निर्धारें ठेवून मनीं
ईश्वरा रे तुझ्या दर्शना आलों !

उत्साह माझा
परी मावळला
पवित्र तुझिया–दिव्य आसना स्पर्श मी केला
विटाळलें तुझें पावन मंदीर
कराल ना क्षमा ?...

रक्तानें माखले
हात हे माझे
चिखलाचे पाय
पावलोपावलीं जिव्हा विटाळली
द्वेषमत्सरानें हृदय माझें
पोखरलेलें

असा मी मानव
पापी मी मानव
पुण्यनगरींत
तुझिया आलों
गुन्हेगार झालों...

गौरव चालला असेल माझा
साऱ्या जगांत
विजयी म्हणून स्तुतीचीं फुलें उधळतील
परत जातां पडतील माझ्या हारही कंठीं

कशीं मी सांगूं ?
माझ्या मनांतील अनंत शल्यें

खरंच मी वेडा
तुझ्या निवासें
शुद्ध झालेला
हा कण कण...
पाप माझें मग कसें उरेल ?

परिसाच्या स्पर्शें
लोखंडाचेंही होई सुवर्ण
गिरीशा तुझ्या
पुण्य आसनीं
मस्तक टेकतां
तेनसिंग हा
धन्य जाहला
भाग्य उजळलें—

●

## कृष्णेच्या घाटानें

कृष्णेच्या घाटानें
मजसि दिली नजर नवी
गरुडाचे पंख दिले
बनवियलें आणि कवी

शिकविलेंहि मज यानें
चंद्राशीं बोलाया
नीलनभीं विहराया
ताऱ्यांशीं खेळाया

या हिरव्या राईचें
गूज मला सांगितलें
लाटांच्या गाण्यांतिल
उलगडुनी भाव दिले

पक्ष्यांची भाषा मुळिं
नव्हती माहीत मला
मंजुळ त्या किलबिलिचा
समजावुनि अर्थ दिला

अर्थ दिला जगण्याला
अर्थ दिला मरणाला
सुंदरता सृष्टींतिल
बघण्याला कळण्याला

वस्तु वस्तु विश्वांतिल
मज भुलवी मज खुलवी
कृष्णेच्या घाटानें
मजसि दिली नजर नवी

●

# नवरी पुसे

नव्या नवरीचें कातर मन
तुळशीसीं बोले हळू लाजून

तुळसीबाई ग बोलशील ना
अंतर तुझें खोलशील ना
देशील ना धीर नवखीला या
दाविशील ना ग जराशी माया ?

कसं बोलूं ?...वेल लाजाळूची मी
आजच हें...बोलकी मी नेहमीं
बोलतेंच...सांग पुन्हां बोलुं ना
तूंच ग आधार माझिया मना

कसा ग स्वारीचा स्वभाव बाई ?
सांग गडे मज होऊन ताई
हांस हांस—थट्टा सुचते कशी
रागावूं नको ग सारखी अशी

मी ही अशी बाई वेंधळी पोर
असतील ते ग किती चतुर
सांभाळू कसें ग मन स्वारीचें
कसें बाई मज हें जमायचें ?

ते ग राजबिंड मी साधीसुधी
माहीत नाहीं ग नटणें कधीं
कसा ग तोलून बोलावा बोल ?
कसा सांवरावा मनाचा तोल

सासूबाईंच्या परीक्षेंतून
होईन कां सांग बाई उत्तीर्ण
शिकविलं सारं आईनं मज
जुळेल कां पण इथं तें आज

मामंजींची कशी राखावी मर्जी
दीर-नणंदांना ठेवावं राजी
किती घोकतें मी शिकवलेलं
सारं वागतांना कसं जमेल ?

आलें मी मायेचे तोडून धागे
मन बघे पण चोरून मागें
एकरूप होणें इथल्या घरीं
जमेल ना मज सांग सत्वरीं

तूंच इथं आई तूंच ग ताई
विचारिते तुज हळूंच बाई
सांग सांग मज गुपित सारं
उतर ग माझ्या जीवींचा भार

●

## तुळस सांगे

तुळस मंदशी वाऱ्यानं डोले
हळूंच सुनेच्या कानांत बोले

घरधनीण ग भाग्यवती तूं
आजच आलीस नवख्या घरीं
जरासा संकोच जराशी भीती
असायची बाई तुझिया उरीं

परी तुझिया ग ओठींचं हासूं
दाविते ग तुझ्या मनची खुशी
प्रीतीचा अंकुर तुझ्या अंतरीं
उगाच लटकें मज पुसशी

कांत तुझा बाई लाखांत हिरा
त्याच्या लौकिकाचा जगांत तुरा
आतां कां ? खरंच तुज सांगतें
हंसूं फुटलं ना ! ऐक ना जरा

नको खंत त्यांचा स्वभाव गोड
जशी ग हापूस आंब्याची फोड
तूं ग आवडीची त्यांच्या, प्रेयसी
पुरवितील ग राणीचें कोड

सासू मामंजीही प्रेमळ भारी
जपतील तुज लेकीच्या परी
मायाळू प्रेमळ स्नेहल थोर
वर्षतील त्यांच्या मायेच्या सरी

दीर-नणंदांचें नकोच भय
त्यांच्या दादांची तूं लाडकी राणी
तुझ्या स्नेहशील स्वभावानें ग
फुलेल जिव्हाळा सर्वांच्या मनीं

सासुरवाशिणी नको बावरूं
सारें माहीत या घरचें मज
अपूर्वाई इथें नव्या सुनेची
पडती कां अशा गांठी सहज

लक्ष्मीच घरची आज तूं मुली
उजळ आपुल्या गुणांनीं घर
कलेकलेनें ग वितरी तेज
शीतल सात्विक तूं चंद्रकोर

तुझ्या माउलीचे संस्कार थोर
जागविती तुज सतत बाई
आशीर्वाद माझा सावित्री तुज
उजळो भुवन तुझी पुण्याई

●

## नाहीं सांगितलें तुज

नाहीं सांगितलें तुज
कधीं सांगणार नाहीं
माझी व्यथा ऐकणेंही—
तुला सोसणार नाहीं

लहर तूं पवनाची
इंद्रधनुष्याचा रंग
भावगीताची लकेर
लोल सलील तरंग

तुझें हृदय कोवळें
गोड नाजुकसें फूल
हलक्याशा फुंकरीनें
कोमेजुनीया जाईल

माझ्या मनांतले क्लेश
माझे मलाच ठाऊक
तुझ्या नाचऱ्या जीवना
नको स्पर्शही दाहक

रहा अशीच तूं गात
रहा अशीच फुलत
मीही हंसेन नाचेन
असा तुझ्या संगतींत

परी अंतरींचें शल्य
माझें मीच तें साहीन
आणि हंसतमुखानें
तुझ्या संगतीं राहीन

●

# गवताशीं कां उगाच चाळा

गवताशीं कां उगाच चाळा
काय समजुं मी अर्थ तयाचा
फुलासंगतीं नाजुक कुजबुज
रोख कशावर या खेळाचा ?

नभांत बघसीं निळीं पांखरें
हितगुज कसलें फुलवेलीशीं
पायांनीं उकरून खडा तूं
अलगद अगदीं दूर फेकिसी

अलगद अगदीं बोल मुखांतुन
' हवा किती ही पडली सुंदर '
प्रश्न कुणाला ?...मलाच समजूं ?
उगाच हंसणें नसतां उत्तर

चतुर सखे तूं, मी तर भोळा,
मला न असलें कांहीं कळतें
आडमार्ग कां गूढ कशाला ?
सरळ सांग तुज काय हवें तें–

●

## कृष्णकाहूर

लाजरी पहांट
आली उघडीत
दिशांचे नयन

हिरवी राई
कृष्णेच्या डोहांत
पाहते वांकून

थंडशी झुळुक
फुलवी नाजुक
पुलक फुलें

शुक्राचा तारा
मंद सुशीतल
लाटांत झुले

मंदीरांतली
कांकड आरती
निनादे दूर

निवलें आणि
माझ्या हृदयींचें
कृष्णकाहूर...

●

## कांठावर घाटावर

मंदीराच्या कळसाचा
शोभे सोनेरी मुलामा
सांडी सुषमा चंद्रमा

झगमगती डोहांत
तारकांच्या दीपज्योती
सृष्टिसतीला आरती

वेळूवनांतून कुणी
वाजवितें अलगूज
हळूं उमलते लाज

शिरशिरे थंड हवा
कांटा फुलतो मोहन
नटे मोहरानें मन

कंजाळाच्या झाडावर
झोंपल्यांत राघू-मैना
औदुंबर मात्र सुना

कांठावर घाटावर
कांति सांडते रुपेरी
आणि तुझ्या माझ्या उरीं

# गेलों आपण नदीकिनारीं

गेलों आपण नदीकिनारीं
बोलायातें नाजुक हितगुज
निसर्ग होता तिथें वाजवित
गोड मुलायम मंजुळ अलगुज

सांध्य नभाची सुवर्ण छाया
करित जळावर होती नर्तन
मंदवायुची लहर सुगंधित
साथ तयाला देई रंगुन

ढग एखादा निळा गुलाबी
नौकेपरि डौलांत तरंगे
कंजाळाचीं शिरें डोलतीं
जोडिति नातें गगनासंगें

मिस्किल कुठली तरी चांदणी
कुणास पाहुन हंसते गालीं
डोहांमधल्या तरंगावरी
अवचित फुटते हळवी लाली...

संध्या सरली, आली रजनी
घरीं निघालों परतुन आपण
नवलच ! विरलें गूज मनांतच
कसे मनांतुन मोहरलों पण!

## हृषीकेशच्या गंगेवरतीं

हृषीकेशच्या गंगेवरतीं
मनांत माझ्या नव्हतें कांहीं
घर नव्हतें अन् पाशहि नव्हते
नव्हती प्रीती कुठल्या ठायीं

साहित्यांतिल हळव्या वृत्ती
व्यवहारांतिल विविध भावना
विकार नव्हते, विचार नव्हते
खुला मनाचा निर्मळ ऐना

एकच होतें उदात्त कांहीं
पवित्र कांहीं उज्वल कांहीं
धुंदी होती जगावेगळी
नांव तियेचें माहित नाहीं

# शेवरी

तेज लानीस चढे
मळींतली शेवरी
फुले नव्या अंकुरीं

बाळसं ये मक्याला
हाच मळीचा राजा
करी सोन्याच्या साजा

वरण्यांची वेलांटी
हराळीशीं घोटाळे
घाली गळ्यांत गळे

बाभळीशीं नाजुक
फडफडला शेव
कसलें हें लाघव

शीळ कुठून आली
नदीच्याच किनारीं
कुजबुजली चोरी

राजा कां हा बावरे
शेवरीच्या मनांत
फुलें कसलें गीत

●

# असेंच होतें ऊन कोंवळें

असेंच होतें ऊन कोंवळें
शिवार होतें असेंच चमकत
हिरव्या पिवळ्या पात्यांवरती
असेंच होतें मोतीं चमकत

अशीच होती तूर लाजरी
ज्वानीनें अंगांगीं निथळत
रानफुलांचें गंधित गाणें
शीतल वारा होता उधळित

धांवत होता जवळुन निर्झर
फेनफुलांचा झुलवित मोहर
गोड गारवा भरला भंवतीं
अवखळ धुंदी तनूमनावर

अशाच वेळीं या बांधावर
असेच होतों आतुर आपण
सांगु नको पण मधुर स्मृती ती
कधीं तरी जाते ना फुलवुन !

●

## पिसें

वडाच्या झाडाशीं
पिंपळ पाराशीं
शोधितें मी कांहीं
आतुर अधाशी

रात्रीं अपरात्रीं
अशी जाग येते
काळोखांत कांहीं
अबोध शोधितें

चांदण्यांत कधीं
नजर टाकून
टिपाया पाहतें
हरपले कण

रातराणी खुळी
सुगंध वितरी
आणि मीही पिशी
अशांत बावरी

अशांत अधीर
शोधितें शोधितें
अघोरी हें पिसें
अधिक डसतें

●

## नदीकिनारीं

नदीकिनारीं
निवे कधींची
वर्दळ सारी

चुकार पक्षी
नभामधुनी
चालला घरीं

वाळलें पान
पडतें जळीं
करितें स्नान

मळ्या पेंगती
कंजाळ गाईं
अंगाईं गान

आली चाहूल
तमाचें मंद
पडे पाऊल

त्याच्या कुशींत
चराचरानें
घेतली भूल

नदीकिनारीं
थरारे एक
नजर निळी

नजर निळी
मुशाफिराला
कुण्या न्यहाळी

●

# अशाच वेळीं निळ्या जळावर

अशाच वेळीं निळया जळावर
अशीच नौका डुले
मनांतिल गूज आपुल्या फुलें...

असेंच होतें धुंद चांदणें
त्यांत मिसळलें मनिंचें गाणें
त्या गाण्याच्या सुरासुरांतुन भाव प्रीतिचा खुले

जरा बिलगुनी बसतां आपण
खुदखुदल्या तारका नभांतुन
चंद्रहि हंसला खट्याळ, त्याला बघवेना चांगलें

हळूं चालली नौका पुढतीं
शांत जळावर तरंग उठती
तयांत अपुल्या अंतरांतले गोड रंग मिसळले

त्या रंगांतुन त्या गूजांतुन
घडलें अपुलें मंगल मीलन
चांदरात झुलविते अजुनि त्या आठवणींचे झुले

●

# रात झाली

रात झाली
सृष्टि सारी
तिमिराची
काळी शाल
पांघुरली

रानवारा
दिनभरी
भागलेला
झोपडींत
झोंपीं गेला

डोहामध्यें
एखादेंच
जीर्ण शीर्ण
पडे पान

थरथरे
क्षणभर
निर्झराचें
शांतपण

आणि अशा
रातींतही
वेड्यावाणी
कसलीशी
गूढशी मी
गातों गाणीं

●

## नाहीं ग आला

शरद हंसला
हंसेना कां तो
कशी मी हांसूं

फुलें फुलली
फुलवीत मीं
शल्यें कां बसूं

रंगली उषा
रंगूं दे तिला
कशी मी रंगूं

कोकिळा गाते
गीत तसें मी
कुणाला मागूं

रंगली रात
रंगले तारे
रंगले वारे

रंग दुनिया
माझ्या मनींची
नच मोहरे

सृष्टि खुलते
सृष्टि फुलते
फुलूं दे तिला

माझ्या मनींचा
शरद अजून
नाहीं ग आला !

नाहीं ग आला !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम २२८५१ वि: काव्य
क्रमांक ११३८४ नों: दि: [illegible]

# मला ती आवडते झोपडी

मला ती आवडते झोपडी
आठवणींची गर्भरेशमी उलगडतें मी घडी !

कृष्णाकाठीं घरकुलांत या
नादी लागुन सखया तुझिया
हळुंच लागलें मी चाखाया
प्रीतीची गोडी

स्वच्छ हांसरें समोर अंगण
पारिजात करि सुगंध पखरण
तळीं तयाच्या तुजला पाहुन
झालें मी वेडी

ओळख झाली झाल्या भेटी
खुलें चांदणें हंसऱ्या ओठी
रात्र निवळली वदतां गोष्टी
उलगडतां कोडीं

कोडीं सुटलीं सुटली शप्पथ
आवडिची मज लाभे संगत
प्रेमजलावर अतां तरंगत
अपुली रे होडी

ब्याऐंशी

जलवंती

# तृप्ति

कृष्णातीरीं माझें सदन शोभतें
मांगल्यदीपांनीं नित्य उजळतें
काव्यशास्त्र आणि विनोदाची बाग
यांनीं मोहरतें माझें अंतरंग

भंवतीं सुंदर साहित्यसंभार
रसिक मित्रांचा लाभला शेजार
नवनवीं ध्येयें रचितों मनांत
आणि अंतरांत उज्ज्वल संगीत

कधीं चांदण्यांत मित्रांच्या संगतीं
हंसत नौकेंत खुलवितों रातीं
मोजीत तारका बोलत चंद्राशीं
शिरीं उधळितों मांगल्याच्या राशी

कधीं माउलीच्या अगाध छायेंत
पत्नीबाळांसह बसून निवांत
ऐकतों तिचिया रसमय कथा
शमवितों सारी अंतरींची व्यथा

कधीं साहित्यिक विद्वान रसिक
यांच्या आगमनें ओसंडतें सुख
सत्संगाचें गोड सुधारसपान
करीतसें माझें जीवन प्रसन्न

निसर्गाची रम्य शीतळ सांवली
भाग्य माझें मज सहज लाभली
चालवीत सेवा काव्यदेवतेची
भोगितों घटिका अपार सुखाची

• • •

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५६९

ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
22649 दि:
REFBK-0010561
REFBK-0010561

कुलकर्णी ग्रंथागार
१८६ शनवार, पुणें २.

मूल्य दोन रुपये

आमचीं
## काव्य प्रकाशनें

१. जोगिया
—ग. दि. माडगूळकर ३॥
२. मेघालोक
— प्रा. द. वि. जोग २
३. अरुणा
— भालचंद्र खांडेकर २
४. आम्बराई
—गिरीश २।
५. माझीं भावगीतें
—बाबूराव गोखले २
६. छायाप्रकाश
—सौ. आनंदीबाई लेले २
७. गडे, तूं म्हण
( भावगीतें ) ॥
८. रुमझुम
—ना. सी. फडके १
९. चार संगीतिका
—ग. दि. माडगूळकर १
१०. जलवंती
—सुधांशु २